सन २०१९-२० करिता एकूण वार्षिक तरतूदीच्या ६०% च्या मर्यादेत निधी BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क.१६(१)/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३१ जुलै, २०१९

<u>संदर्भ</u> :- १) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं- २०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.१ एप्रिल,२०१९
२) शासन निर्णय,उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१६/ऊर्जा-३, दि.२५ एप्रिल, २०१९
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं- २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३,दि.८ जुलै, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१९-२० च्या मूळ अर्थसंकल्पिय तरतूदीच्या वित्त विभागाच्या संदर्भिय परिपत्रक क्र. १ अन्वये लेखानुदानाच्या मर्यादेत (३३%) या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली मुख्य विद्युत निरिक्षक कार्यालय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,यांना संदर्भिय शासन निर्णय क्रमांक २ अन्वये निधी BEAMS प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला होता.

२. वित्त विभागाच्या संदर्भिय परिपत्रक क्र. ३ अन्वये सन २०१९-२० च्या एकूण वार्षिक तरतूदीच्या ६०% मर्यादेत अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत निधी BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे. त्या अनुषंगाने मुख्य विद्युत निरिक्षक कार्यालय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांना संदर्भिय शासन निर्णय क्रमांक ३ अन्वये BEAMS प्रणालीवर ३३% च्या मर्यादेत उपलब्ध करून देण्यात आलेला निधी वजा जाता शिल्लक निधी BEAMS प्रणालीवर उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०१९-२० च्या प्रथम नऊमाहिकरिता (डिसेंबर, २०१९ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६०% च्या मर्यादेत संदर्भिय शासन

निर्णय क्र. २ अन्वये वितरीत करण्यात आलेला लेखानुदानाचा (३३% च्या मर्यादेत) वजा जाता शिल्लक निधी BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. ३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०७३११६५५१२००१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2019.07.31 17:02:03 +05'30'

(ना. रा. ढाणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, सार्वजनिक बांधकाम प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर मुंबई-४०० ०७१
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, हाँगकाँग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.
३) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
४) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
५) सचिव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर नं.१, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-०५
६) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,पुणे म्हाडा कमर्शियल कॅाम्पलेक्स, सर्वे नं.१९१- फेज, येरवडा, पुणे-४११ ००६
७) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई
८) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
९) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
११) अधिदान व लेखा अधिकारी, अराप / रालेवि-१), चर्चगेट, मुंबई.
१२) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे, मुंबई
१३) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
१४) कक्ष अधिकारी (रोख), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१५) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२
१६) उप सचिव (श्री. बडगेरी) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१७) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.